# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:24.04.2026** **वारः शुक्रवार**

1. पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात विक्रमी मतदानाची नोंद, तामिळनाडूमध्येही भरघोस मतदान
2. पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकांसाठी मतदानोत्तर मार्गदर्शक तत्त्वांची नवीन नियमावली जारी
3. भारतीय नागरिकांनी इराणचा प्रवास करू नये- इराणमधील भारतीय दूतावासाचा सल्ला आणि
4. देशाच्या विविध राज्यांमध्ये उष्णतेच्या लाटेचा हवामान विभागाचा इशारा

**मतदान**

पश्चिम बंगालमधील विधानसभा निवडणुकांच्या पहिल्या टप्प्यात भरघोस 91 पूर्णांक 78 टक्के मंतदानाची नोंद झाली असून स्वातंत्र्यानंतर आतापर्यंतचं हे सर्वाधिक मतदान आहे. तमिळनाडूमध्येही काल 84 पूर्णांक 69 टक्के इतक्या विक्रमी मतदानाची नोंद झाली. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आणि निवडणूक आयुक्त डॉ. एस. एस. संधू तसंच डॉ. विवेक जोशी यांनी 'लाईव्ह वेबकास्टिंग'द्वारे मतदानावर बारकाईनं लक्ष ठेवलं होतं. या दोन्ही राज्यांमधील सर्व मतदान केंद्रांवर ही सुविधा सुनिश्चित करण्यात आली होती. दरम्यान पश्चिम बंगालमध्ये मतदानाच्या वेळी काही ठिकाणी उमेदवारावर हल्ला केल्याचे तसंच ईव्हीएमशी छेडछाड केल्याचे प्रकार समोर आले आहेत. या प्रकरणी पाच जणांना अटक झाली असून निवडणूक आयोगाने आतापर्यंत 400 तक्रारी नोंदवल्या आहेत.

**पोटनिवडणुक**

महाराष्ट्रातही बारामती आणि राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीसाठी काल मतदान झालं. बारामतीमध्ये 58 पूर्णांक 27 टक्के आणि राहुरीत 55 पूर्णांक 31 टक्के मतदान झालं. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे बारामतीतली जागा तर शिवाजी कर्डिले यांच्या निधनामुळे राहुरीची जागा रिक्त झाली होती. दोन्ही मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी मतमोजणी 4 मे रोजी होणार आहे. गुजरातमधील उमरेठ इथंही विधानसभा पोटनिवडणुकीसाठी 59 टक्के मतदान झालं.

**मार्गदर्शक तत्त्व**

निवडणूक आयोगानं पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकांसाठी मतदानोत्तर मार्गदर्शक तत्त्वांची एक नवीन नियमावली जारी केली आहे. मतदानाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर लक्ष ठेवणाऱ्या कॅमेऱ्यांची आणि व्हिडिओ माहितीची हाताळणी करण्याबाबत आयोगानं ही कडक नियमावली निश्चित केली आहे. या नवीन मार्गदर्शक तत्त्वांनुसार, मतदान केंद्रांवरील कॅमेऱ्यांमध्ये वापरलेली एस डी कार्ड्स मतदान संपताच त्वरित बाहेर काढता येणार नाहीत. संबंधित अधिकाऱ्यांना केवळ कॅमेरे काढून घेण्याची परवानगी असेल; त्यानंतर हे कॅमेरे 'सेक्टर ऑफिसर'च्या देखरेखीखालीच ठेवणं अनिवार्य असणार आहे. ही कार्डस त्यासाठी निश्चित करण्यात आलेल्या 'डेटा संकलन आणि स्वीकार केंद्रावर' सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या उपस्थितीतच बाहेर काढणं अनिवार्य करण्यात आलं आहे. मतदानादरम्यान चित्रित झालेले सर्व व्हिडिओ फुटेज सुरक्षितपणे आणि पद्धतशीरपणे जतन करणं आवश्यक असून जोपर्यंत कॅमेऱ्यांचं सर्व साहित्य पूर्णपणे काढून घेतले जात नाही, तोपर्यंत मतदान पथकातील कोणत्याही सदस्याला किंवा बूथ लेव्हल ऑफिसरला मतदान केंद्र सोडून न जाण्याचे आदेश देण्यात आले आहेत. दरम्यान, मतदानाच्या दुसऱ्या टप्प्यासाठी 'वेबकास्टिंग'ची चाचणी आज सकाळी 10 वाजता सुरू होणार असून ही चाचणी प्रक्रिया तीन सत्रांमध्ये पार पडेल. पश्चिम बंगाल विधानसभेच्या 294 जागांसाठी होणाऱ्या निवडणुकांचा पहिला टप्पा काल पार पडला, तर दुसरा टप्पा 29 एप्रिल रोजी होणार आहे. मतांची मोजणी 4 मे रोजी केली जाणार आहे.

**<u>बिहार विश्वास मत</u>**

बिहारचे मुख्यमंत्री सम्राट चौधरी आज विधानसभेच्या विशेष एकदिवसीय अधिवेशनात विश्वासमत प्रस्ताव मांडणार आहेत. हे सत्र सकाळी 11 वाजता सुरू होईल. सर्व पक्षाच्या मंत्री आणि आमदारांना या सत्राला उपस्थित राहाण्यास सांगण्यात आलं आहे. सम्राट चौधरी यांनी 13 एप्रिल रोजी मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली आहे. बिहार विधानसभेत 243 आमदार असून, विश्वासमत जिंकण्यासाठी 122 मतांची आवश्यकता आहे.

**<u>मन की बात</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी येत्या रविवारी 26 एप्रिलला सकाळी अकरा वाजता आकाशवाणीवरील मन की बात या कार्यक्रमाद्वारे देश परदेशातील नागरिकांशी संवाद साधणार आहेत. या कार्यक्रमाचा हा 133 वा भाग असेल. आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्या तसंच यूट्यूब वाहिन्यांवरूनही याचं थेट प्रसारण होणार आहे.

**<u>भारतीय दूतावास</u>**

भारतीय नागरिकांनी हवाई किंवा रस्ते कोणत्याही मार्गाने इराणचा प्रवास करू नये असा सल्ला इराणमधील भारतीय दूतावासानं दिला आहे. प्रादेशिक तणावामुळे हवाई उड्डाणांवर असलेले निर्बंध आणि अनिश्चितता कायम असल्यानं आंतरराष्ट्रीय उड्डाणांवर परिणाम होत असल्याच दुतावासानं म्हटलं आहे. भारतीय नागरिकांनी दूतावासाशी समन्वय राखत निर्धारित मार्गांनीच देश सोडावा असंही आवाहन केलं आहे.

**<u>ट्रम्प-इराण-युद्ध</u>**

इराणविरूद्धच्या संघर्षांत आण्विक शस्त्रास्त्र वापरण्याची शक्यता अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी फेटाळून लावली आहे. इराणशी सर्वोत्तम शांतता करार होण्याची आशा असून, आपल्याला कोणतीही घाई करायची नाही, असं ते म्हणाले. त्याचबरोबर, कोणालाही आण्विक शस्त्रास्त्र वापरण्याची परवानगी दिली जाऊ नये असंही त्यांनी नमूद केलं. युद्धविरामाला मुदतवाढीची घोषणा केल्यानंतर दोन दिवसांनी व्हाईट हाऊसमध्ये आयोजित पत्रकार परिषदेत ट्रम्प यांनी ही टिप्पणी केली आहे. इराणमध्ये अंतर्गत कलह असून, अमेरिका इराणसमवेत सर्वोत्तम आणि कायमस्वरूपी करार करण्याच इच्छुक असल्याचंही त्यांनी नमूद केलं.

**<u>संयुक्तराष्ट्र अध्यक्ष</u>**

संयुक्त राष्ट्राच्या महासभेच्या अध्यक्ष ॲनालेना बेअरबॉक पुढल्या आठवड्यात भारत दौऱ्यावर येणार असून, त्या सरकारी अधिकाऱ्यांसमवेत अनेक द्विपक्षीय बैठका घेणार आहेत. संयुक्त राष्ट्रांचे निवासी समन्वयक स्टीफन प्रीसनर यांच्या नेतृत्वाखालील भारतातील 'संयुक्त राष्ट्र देश पथका'चीदेखील त्या भेट घेतील. पुढे बेअरबॉक चीनच्या दौऱ्यावरही जाणार असल्याचं त्यांच्या प्रवक्त्या ला नीस कॉलिन्स यांनी सांगितलं. दोन्ही देशांनी त्यांना आमंत्रित केलं आहे.

**<u>समाजमाध्यम</u>**

भारत-अमेरिका संबंधांसंदर्भाने, समाज माध्यमांवरील एका संदेशांमध्ये भारतीयांचा संदर्भ देऊन करण्यात आलेली टिप्पणी अपुऱ्या माहितीवर आधारित आणि अनुचित असल्याचं परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जैस्वाल यांनी म्हटलं आहे. उभय देशांदरम्यान परस्पर आदर आणि सामाईक हितांवर आधारित दीर्घकालीन संबंध असल्याचं म्हटलं आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी एका पॉडकास्ट सादरकर्त्याचा मजकूर समाजमाध्यमांवर सामाईक केला होता, त्यामध्ये भारतीयांबद्दल अपमानकारक टिप्पण्या करण्यात आल्या होत्या.

**<u>पंचायत राज</u>**

पंचायत राज मंत्रालय आज दिल्लीत राष्ट्रीय पंचायत राज दिन साजरा करणार आहे. या निमित्ताने पंतप्रधानांच्या संदेशाचं वाचन करण्यात येणार असल्याचं मंत्रालयानं नमूद केलं आहे. देशभरातील प्रतिनिधी तसंच पदाधिकारी यांच्यापर्यंत हा संदेश पोहोचवला जाईल. अशी माहिती मंत्रालयानं दिली आहे. या कार्यक्रमाला पंचायत राज राज्यमंत्री एस. पी सिंह बघेल तसंच

मंत्रालयाचे सचिव आणि इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहाणार आहेत. यावेळी पंचायत प्रगती निर्देशांकाचा अहवाल तसंच 'मेरी पंचायत मेरी धरोहर' या विषयावरील तीन पुस्तकांचे प्रकाशन होणार आहे. हा दिवस 73 व्या घटनादुरुस्ती अधिनियमाच्या अंमलबजावणीचे स्मरण म्हणून साजरा केला जातो; या ऐतिहासिक अधिनियमाद्वारे देशभरातील पंचायती राज संस्थांना घटनात्मक दर्जा आणि कायदेशीर मान्यता प्रदान करण्यात आली होती.

**सीतारामन-बँक**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन आणि इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल अनुसुचित व्यावसायिक बँकांसमवेत एका उच्चस्तरीय बैठकीचं अध्यक्षस्थान भूषवलं. या बैठकीत आर्टिफिशिअल इंटेलिजन्सशी संबंधित धोक्यांच्या संभाव्य परिणामांबाबत विचार मंथन करण्यात आलं. यामुळे उद्भवणाऱ्या धोक्याचा त्वरीत आणि प्रभावी सामना करण्यासाठी समन्वित संस्थात्मक यंत्रणा विकसित करण्याचा सल्ला त्यांनी इंडियन बँक असोसिएशनला दिला आहे.

**संयुक्तराष्ट्र सरचिटणीस**

संयुक्त राष्ट्रांच्या नव्या सरचिटणीस पदाच्या निवड प्रक्रियेचा भाग म्हणून, परराष्ट्र मंत्रालयाचे पश्चिम भागाचे सचिव सिबी जॉर्ज काल संयुक्त राष्ट्राच्या आमसभेनं आयोजित केलेल्या संवाद चर्चासत्रात सहभागी झाले. यामध्ये भारतीय हितसंबंधांशी निगडीत विविध मुद्यांवर चर्चा झाली.

**बॅडमिंटन**

डेन्मार्कमध्ये बीडब्ल्यूएफ थॉमस आणि उबर करंडक स्पर्धेच्या अंतिम फेरीचे सामने आजपासून सुरू होणार आहेत. भारतीय पुरुष संघाचा सामना आज कॅनडाच्या संघाशी होणार आहे. त्यानंतर ऑस्ट्रेलिया, चीन या संघांबरोबर सामना होणार आहे. तर पी. व्ही. सिंधू हिच्या नेतृत्वाखाली भारतीय महिला संघही विजेतेपदाला गवसणी घालण्यात उत्सुक आहेत. संघाचा आज डेन्मार्कच्या संघाशी सामना होईल. तर उद्या युक्रेन आणि सोमवारी चीन या संघांशी सामना होणार आहे.

**हवामान**

भारतीय हवामान विभागानं आज दिल्ली, पंजाब, हरयाणा, चंडीगड, राजस्थान, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश आणि महाराष्ट्राच्या काही भागात उष्णतेच्या लाटेचा इशारा दिला आहे. तसंच बिहार, केरळ, माहे, झारखंड आणि छत्तीसगडमध्येही उष्णतेच्या लाटेशी शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. तर कोकण, गोवा, कर्नाटकचा किनारी भाग, आदी ठिकाणी उष्ण आणि दमट हवामान राहाणार आहे. तर जम्मू-काश्मीर, लडाख आणि लगतच्या प्रदेशात तसंच आंध्र प्रदेश, आसाम आणि मेघालयमध्येही विजांचा कडकडाट आणि सोसाट्याच्या वाऱ्यासह वादळी पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

# या बरोबरच हे ऱाष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.